# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/02/2024 (बुधवार) सकाळ


## अवैध्यरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक २७/०२/२०२४ रोजी ०३.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान पो. स्टे. अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारांकडुन खबर मिळाली कि, ट्रॅक्टर (मुंडा) क्र. एम. एच. –४०/सी. ए. ५१५६ व विना क्रमांकाची ट्रॉली वाहनाने अवैध्यरित्या रेती घेवुन खात कडे येत आहे. अश्या मिळालेल्या खबरेवरून अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर कार्यवाही करणे कामी फिर्यादी पोलीस स्टाफसह रवाना झाले. फिर्यादीला त्याच्या दिशेने समोरून एक ट्रॅक्टर ट्रॉली येतांना दिसली. सदर ट्रॅक्टर ट्रॉलीच्या चालकास थांबण्याचा इशारा केला असता, त्याने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली रोडच्या बाजुला लावली व ती ट्रॅक्टर ट्रॉली तिथेच सोडून अंधाराचा फायदा घेवून तो पळून गेला. त्याचा पाठलाग केला असता तो मिळून आला नाही. घटनास्थळी ट्रॅक्टर ट्रॉलीची पाहणी केली असता एक निळया रंगाचा पॉवर ट्रक कंपनीचा ट्रॅक्टर (मुंडा) क्र. एम. एच. –४०/सी.ए.– ५१५६ व विना क्रमांकाची निळया रंगाची ट्रॉली दिसून आली. त्या ट्रॉलीमध्ये अंदाजे १ ब्रास रेती भरलेली दिसून आली. नमुद ट्रॅक्टर (मुंडा) क्र. एम.एच. ४०/सी.ए.– ५१५६ किंमती अंदाजे ३,००,०००/– रू., विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे १,५०,०००/–रू. व त्यामध्ये भरून असलेली एक ब्रास रेती अंदाजे ३,०००/–रू. असा एकूण ४,५३,०००/–रू. चा मुद्देमाल घटनास्थळावरून ताब्यात घेवून जप्त करण्यात आला. **आरोपी चालक व मालक नामे–** हिरामन ढेकल गिरीपुंजे, वय ३९ रा. खात यांचेविरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३७९, १०९ भा.दं.वि. सहकलम ४८ (७), ४८ (८), महा. जमिन महसुल अधि. १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. १९५७, सह कलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रति. अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात अरोली येथील ठाणेदार निशांत फुलेकर पोहवा मनोज जयस्वाल यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर